नि.फौ.ख.क्र. ८६/२०१६
सरकार –वि– तानाजी जुनारे

**<u>निशाणी क्र. ३२</u>**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची जबानी.
देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नांव – संगिता सुरेंद्र भिडे,
माझे वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,
राहणार – शेंबा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

– – – – –

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.वाहूरवाघ यांच्यामार्फत</u>**

सन २०१६ साली मी शेंबा गावात सरपंच होते. गावात पाणी पुरवठा करण्याकरिता नळगंगा धरणापासुन गावातील आर.ओ. प्लॅन्ट पावेतो ६ इंची पाईप लाईन करण्यात आली आहे. आमचे कर्मचारी संतोष बारकु बोरकर याच्याकडे गावात पाणी सोडण्याचे काम होते. त्याने सांगितले होते की, पाण्याच्या टाकीत पाणी नाही. तेव्हा मी त्यास सांगितले की, पाईप लाईनची तपासणी कर. तेव्हा पाईप लाईनची पाहणी करत करत आम्ही आरोपीच्या शेता पर्यंत गेलो. त्याने त्याच्या शेतात कपाशीचे पिक घेतले होते. आमच्या पाईप लाईनला होल करुन त्याने त्याच्या शेतात पाणी पुरवठा केला होता. त्याने प्रत्येकी दोन इंचाचे दोन कनेक्शन घेतले होते. तेव्हा आरोपी त्याच्या घरी होता. तेव्हा आम्ही त्यास शेतात बोलावुन घेतले व चौकशी केली असता त्याने चुक झाल्याचे मान्य केले. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि.जी. परवाल यांच्यामार्फत</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी राखीव जागेवर सरपंच पदाकरिता निवडुन आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा विरुध्द पक्षात होता व त्यांच्या पक्षातिल महिला माझ्या विरुध्द निवडणुक लढवित होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर महिलेचा पराभव झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा पासुन

दोन्ही पक्ष एकमेकांविरुध्द तक्रारी करत होते.

०३. मी इयत्ता सातवी पावेतो शिकलेली आहे. मी सन २०१६ ते सन २०२० पावेतो सरपंच पदावर कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, शेंबा ग्राम पंचायतीपासुन पोलीस ठाणे विस मिनीटाच्या अंतरावर आहे. आम्ही आरोपीच्या शेतात दुपारी १ ते १.३० च्या सुमारास पोहचलो होतो. टाकीत पाणी नसल्याबाबत माला घटनेच्या दिवशी सांगण्यात आले होते. फिर्याद देण्याकरिता मी देखील गेली होती. फिर्यादीने घटनेच्या किती दिवसानंतर फिर्याद दिली होती हे माला सांगता येणार नाही. मी आरोपीचा जमीनीचा उतारा पाहिला नाही. शेताच्या मालकाबाबत आम्ही चौकशी केली होती. मी स्वतः पोलीसांकडे जमीनीचा उतारा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पाईप लाईन जोडण्यात आली होती ते शेत आरोपीच्या मालकीची नाही. सदर शेताचे गट क्रमांक व क्षेत्रफळ माला माहित नाही. सदरची जमीन सुपाडाजी जुनारे यांच्या मालकीची असल्याबाबत माला माहित नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, पाईप लाईन फोडुन कनेक्शन घेतांना मी आरोपीस पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पाईप लाईन पाहण्याकरिता मी गेलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमचा राजकीय विरोधक असल्यामुळे आम्ही त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

नांदुरा. **(म.बा.आसिजा)**
दिनांक – २३/११/२०२१. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

– – – – –

**निशाणी क्र. ३०**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी.
देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नांव – अक्षय बळीराम बगाडे,
माझे वय – २७ वर्षे, धंदा – फोटाग्राफर,
राहणार – शेंबा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

– – – – –

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.वाहूरवाघ यांच्यामार्फत**

सन २०१६ साली मी फोटोग्राफीचा व्यवसाय करत होतो. तेव्हा आरोपीच्या शेतात पाईप–लाईन जोडल्याबाबत फोटोग्राफी व शुटींग करण्याकरिता माला वासुदेवने बालाविले होते. तेथे गावाचे सरपंच, ग्रामसेवक, इतर सदस्य व पोलीस हजर होते. त्यांनी जागेवर खोदकाम करुन पाईप कनेक्शन बाहेर काढले. त्या कार्यवाहीबाबत फोटो काढुन जागेवर व्हीडीओ शुटींग केली होती. माझ्याकडे कॅनन कंपनीचा १३०० मॉडेलचा डिजीटलचा कॅमेरा होता. माला सदर कॅमेरा हाताळण्याची माहिती आहे तसेच मी त्या कॅमे–यात काढलेले फोटो तयार करु शकतो. त्या प्रकरणात माझ्या कॅमे–याने काढलेले फोटो मी तयार केले व ते पोलीसांकडे दिले. माला आता अभिलेखातील सदरचे आठ फोटो दाखविण्यात आले. ते फोटो वस्तु **'अ'** ते वस्तु **'फ'** वर आहे.

०२. फोटो काढल्याबाबत पोलीस स्टेशन मार्फत माला त्याचा मोबदला देण्यात आला होता. त्याबाबत मी त्यांना पावती दिली होती. माला आता सदरची पावती दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. पावती **निशाणी क्र. ३१** वर आहे. जागेवर शुटींग तयार केल्याबाबत मी डीव्हीडी तयार केली होती. ती डीव्हीडी मी पोलीसांकडे दिली होती. त्यात पाईप – लाईन फोडल्यापासुन संपुर्ण कार्यवाहीची शुटींग आहे. सदर डीव्हीडीला वस्तु **'ब'** देण्यात येते. पोलीसांनी माझा जबाब देखील नोंदविला होता. मी तानाजी जुनारे यास ओळखतो. तो

आजरोजी न्यायालयासमोर हजर आहे.

## उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि.जी. परवाल यांच्यामार्फत

०३. फोटो तयार केल्यापासुन ते आजपावेतो पोलीसांनी माझ्याकडुन कोणतेही प्रमाणपत्र घेतलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरणातील फोटोवर फोटो काढल्याची तारीख नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या शेतात गेलो होतो त्या शेताच्या मालकाबाबत ७/१२ उतारा पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फोटोंवरुन शेत कोणाच्या मालकीचे आहे हे दिसुन येत नाही. जागेवर वासुदेव काटकर यांनी खोदकाम केले होते.

०४. मी फोटोग्राफी व फोटो तयार करण्यासंदर्भात कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नाही. मी एकाच कॅमे–याने फोटोग्राफी व व्हीडीओ शुटींग केली होती. हे म्हणणे खरे आहे की, शुटींग केल्यानंतर डीव्हीडी तयार करण्याचे काम मी स्वतः करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु ब वरिल डीव्हीडी कश्या संदर्भात आहे याचा उल्लेख त्यावर करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, डीजीटल कॅमे–यात काढलेल्या फोटात फेरफार करता येते. मी जागेवर १० ते १२ फोटो काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यातुन काही फोटो निवडुन पोलीसांनी घेतले होते.

०५. मी जी.एस.टी नोंदणी केलेली नाही. माझ्याकडे दुकान व अस्थापना परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३१ वरिल पावती माझ्या दुकानाच्या नावाने नाही. मी त्यावर सही करुन दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर जावुन फोटो काढुन, व्हीडीओ शुटींग करुन, ते फोटो तयार करुन फोटो तसेच डीव्हीडी व पावती पोलीसांना दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वासुदेव भिडे हे ग्राम पंचायत सदस्य नाहीत. माला फोटो काढण्याबाबत लेखी पत्र देण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी डीव्हीडी तयार केली नसल्याने त्यात फेरबदल करण्यात आला आहे किंवा नाही हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोटोंवर शेताच्या गटाचा क्रमांक नमुद नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी सरपंचांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
**(म.बा.आसिजा)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – २३/११/२०२१.

– – – – –